**सत्र खटला क्र.१४/२०२३**
**शासन वि. सुभाष व इतर**
**निशाणी क्रमांक ६०**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.५ यांची जबानी**

मी याव्दारे शपथेवर निवेदन करते की,
माझे नावः– नरसींग विठ्ठल पिटले
वयः– ८० वर्षे, व्यवसायः–शेती
राहणार – बालाजीवाडी, जि. लातूर

**सरकार पक्षातर्फे सरतपासणी सहायक सरकारी अभियोक्ता श्री.पी.के.जाधव यांच्या मार्फतः–**

मृतक अरविंद नरसींग पिटले हा माझा मुलगा होता. आरोपी क्र.२ सुनीता अरविंद पिटले ही अरविंदची पत्नी आहे. अरविंदला दोन मुली आहेत. त्या दोन्ही मुलींचे लग्न झालेले आहे. मी अरविंदच्या घरी रोज सकाळी १०.०० वाजता डब्बा घ्यायला जायचो त्यावेळी मला आरोपी सुभाष शिंदे हा त्याच्या घरामध्ये बसलेला दिसायचा. मला माझी दुसरी सून ज्योती हिने सांगीतले की, आरोपी सुभाष हा रोज अरविंदच्या घरी येतो आणि रात्री तिथेच झोपतो. यामुळे मला असा संशय आला की आरोपी क्र.१ आणि २ यांच्यामध्ये काही संबंध असावेत. अरविंद मला असे म्हणाला की त्याला पुण्याला जायचे आहे. दुस–या दिवशी मला अरविंदने सांगीतले की, तो पुण्याला गेलेला नाही व लातूर येथेच काही कामानिमीत्त रुम करुन राहत आहे. रोज संध्याकाळी ८.३० वाजता मला अरविंदचा फोन यायचा. घटना घडण्याच्या पूर्वीच्या गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार रोजी मला अरविंदचा फोन आला नाही.

२. माझ्या मेव्हणीचा नातू पोलीस खात्यामध्ये आहे. त्याने मला विचारले की, माझ्या फोनचे सिम मी अरविंदला दिले आहे का. मी माझ्या फोनचे सिम

अरविंदला दिले होते. त्याने मला सांगीतले की, बाभळगावच्या तळयामध्ये अरविंदचे प्रेत सापडले आहे. पोलीसची गाडी मला घ्यायला आली होती. पोलीस मला सरकारी दवाखान्यात प्रेत ओळखण्यासाठी घेवून गेले होते. प्रेत बघून मी ओळखले की, हे अरविंदचे प्रेत आहे. पोलीसांनी माझ्यासमक्ष तिथे कारवाई करुन तिथे माझा अंगठा घेतला.

३. मला नंतर समजले की, आरोपी क्र.१ आणि २ यांनी संगनमत करुन अरविंदला मारले आहे. मला नंतर असेही समजले की त्या दोघांना सोबत राहायचे असेल म्हणून त्यांनी अरविंदला मारले आहे. मला आता न्यायालयाच्या टीव्ही स्क्रीनवर व्हीसीव्दारे हजर दोन्ही आरोपी दिसत आहेत. त्या दोन आरोपींपैकी एक आरोपी सुभाष शिंदे आहे आणि दुसरी आरोपी सुनिता पिटले आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ व २ तर्फे श्री.एस.एस.नळेगावकर विधीज्ञ यांच्यामार्फत</u>**

४. मला एकूण ०४ मुले आणि ०२ मुली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी दोन मुले नोकरी करतात. दरेवाडी येथे मला ०४ एकर जमीन होती. ०८–१० वर्षांपूर्वी मी माझ्या मुलांना जमीनी वाटप करुन दिल्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दोन मुलांना दीड–दीड एकर जमीन खाण्यासाठी दिली पण ती जमीन माझ्याच नावाने ठेवली. हे म्हणणे खरे आहे की, मृतक अरविंदच्या दोन्ही मुलींचे लग्न झाल्यानंतर माझे आरोपी क्र.२ सोबत बोलणे बंद झाले. हे म्हणणे खरे आहे की, जोपर्यंत माझी पत्नी जिवंत होती तोपर्यंत आम्ही दोघे आणि अरविंदचे कुटुंब हे सोबत शेतामध्ये राहात होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी मरण पावल्यानंतर सन २०२० मध्ये मृतक अरविंद व त्याची पत्नी गावामध्ये राहायला गेले. हे म्हणणे खरे आहे की, माझा दुसरा

मुलगा संग्राम हा अरविंदच्या घरासमोर एकाच वाडयामध्ये राहत होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी शेतात राहायचो आणि फक्त जेवणाचा डब्बा आणायला त्यांच्या घरी जात होतो. आरोपी क्र.२ काय काम करायची हे मला माहीत नाही. माझा जेवणाचा डब्बा आणायला मी माझा मुलगा संग्राम याच्याकडे जात होतो. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही मुलींची लग्न झाल्यानंतर अरविंदच्या डोक्यावर भरपूर कर्ज झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या कर्जामुळे त्याच्या डोक्यावर तणाव होता आणि त्यामुळे तो दारु प्यायला लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, अरविंदचे बरेच कर्ज मी फेडले आहे. असे झाले नाही की, माझी दीड एकर जमीन विकून मी अरविंदचे कर्ज फेडले. साक्षीदार सांगतो की, दीड एकर जमीन विकून त्यांनी अरविंदच्या दोन्ही मुलींचे लग्न करुन दिले आणि उर्वरीत पैसे त्यांनी अरविंदच्या हातामध्ये दिले. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दीड वर्षापूर्वीपासून मृतक अरविंद आणि आरोपी क्र.२ जागृती साखर कारखान्यामध्ये कामाला जात होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दीड वर्षांपूर्वीपासून माझे आरोपी क्र.२ सोबत बोलणे होत नव्हते. अरविंद हा लागेल तिथे काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, आलेल्या पैशांतून अरविंद दारु पिवू लागला. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या पूर्वीच मृतक अरविंद आणि त्याची पत्नी त्यांची भांडी आणि इतर साहित्य घेवून निघून गेले. ते कुठे निघून गेले हे मला माहीत नव्हते.

५. घटनेनंतर पोलीसांनी माझ्याकडे विचारपूस केली होती. मी पोलीसांना असे सांगीतले नव्हते की, अरविंदच्या डोक्यावर कर्ज झाल्यामुळे तो दारु पीत होता. मी पोलीसांना असे सांगीतले नव्हते की, माझी दीड एकर शेती विक्री केली व त्यातून

आलेल्या पैशातून काही कर्ज फेडले व काही शिल्लक राहिले व लोक पैशासाठी घरी येवू लागले. मी पोलीसांना असे सांगीतले नव्हते की, मजूरीच्या आलेल्या पैशातून माझा मुलगा अरविंद दारु पिवू लागला. आरोपीच्या विधीज्ञांनी विनंती केली की, वर नमुद बाबींना साक्षीदाराच्या पोलीस जबाबामध्ये अधोरेखांकीत भाग देण्यात यावे. यावर सरकारी वकीलांनी आक्षेप नोंदवला. आक्षेप असा की, न्यायालयामध्ये सांगीतलेल्या गोष्टी पोलीस जबाबामध्ये नसतील तर ते omission or contradiction होतील पण न्यायालयामध्ये ज्या बाबी सांगीतल्या नाहीत आणि त्या बाबी पोलीस जबाबामध्ये असतील तर त्याला omission or contradiction म्हणता येणार नाही. केलेली विनंती आणि आक्षेप अभिलेखावर नोंदवून घेण्यात आला. सदर आक्षेप अंतिम युक्तीवादावेळी विचारात घेतला जाईल.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणीमध्ये मी जे काही कथन केले ते चुकीचे आहे. माझ्या मेव्हणीचा जो नातू पोलीस खात्यामध्ये आहे त्याचे नाव पद्माकर आहे. तो लातूर येथेच नोकरी करतो. हे म्हणणे खरे नाही की, पद्माकरच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/-
(आर.बी.भागवत)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश क्र.२,
लातूर

दि. ३०/०३/२०२६.